**सं.फौ.ख.क्र. ७९३/२०२४**

**सरकार –वि– अलकाबाई बच्छाव**

**निशाणी क्र. १५**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.**

नांव – मनिषा दौलत शिंदे

वय – ३०

पद – महिला पोलिस शिपाई

नेमणूक – चांदवड पोलीस स्टेशन, जि. नाशिक

**<u>सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. दि.२२.०४.२०२४ रोजी मी चांदवड पो.स्टेशनला पो.शि. म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी मी संध्याकाळी ६:३० वाजता पो.स्टेशनला हजर असतांना पो.नि. कैलास वाघ यांनी मला व पो.ह. खैरे, पो.कॉ. बस्ते, पो.कॉ. पवार असे आम्हाला त्यांच्या केबिनमध्ये बोलावून कळविले की, सुतारखेडे गावात एक महिला नामे अलकाबाई बच्छाव ही तिच्या राहत्या घराच्या आडोशाला अवैधरितीने देशी संत्रा दारुची विक्री करत आहे. त्याबाबत तुम्ही जावून कार्यवाही करा असे त्यांनी आम्हाला तोंडी आदेश दिले.

२. आम्ही लगेचच खाजगी वाहनाने हरनूलमार्गे सुतारखेडगावात पो.ह. खैरे, पो.कॉ. बस्ते, पो.कॉ. पवार पोहोचलो. तेथे पो.ह. खैरे यांनी दोन पंचांना बोलावून घेतले. त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे माहिती समजावून सांगितली. त्यांनी पंच म्हणून येण्यास संमती दर्शवली. तेव्हा आम्ही व पंच पायी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी गेलो व खात्री केली असता एक महिला तिच्या घराच्या आडोशाला तिच्या समोर एक कापडी पिशवी ठेवून

बसलेली दिसली. आम्हाला मिळालेल्या माहितीची खात्री पटल्यामुळे आम्ही तिला जागीच पकडले व तिला आमची व पंचांची ओळख पटवून दिली. तिला अंगझडतीचा उद्देश समजावून सांगितला व मी तिची अंगझडती घेतली असता तिच्या ताब्यात २२ प्रिंस संत्रा देशी दारुच्या बाटल्या मिळाल्या.

३. त्यातील एक बाटली पो.ह. खैरे यांनी परिक्षणासाठी काढून घेतली. त्यावर पंचांच्या व पोलिसांच्या सह्यांची कागदी लेबले लावली व त्यानुसार पंचनामा केला. आम्ही आरोपीला पो.स्टेशनला घेऊन आलो व तिच्याविरुद्ध फिर्याद दिली. मला आता मी दिलेली फिर्याद व छापील प्रथम खबर दाखवण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्याला अनुक्रमे **निशाणी १६ व निशाणी १७** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. डी. आर. गांगुर्डे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

४. माझे पदवी पर्यंत शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुतारखेडे हे साधारणतः दीड हजार ते दोन हजार लोकवस्तीचे गाव आहे. मी वरिष्ठांना गुप्त बातमीदाराबाबत विचारले नव्हते. आम्ही ज्या खाजगी वाहनाने गेलो त्याचा नंबर मला सांगता येणार नाही. तसेच त्यावरील चालकाचे मला नाव सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिवाजी गांगुर्डे व कौतिक गांगुर्डे हे आमच्या पो.स्टेशनचे कायमचे पंच आहेत. मला घटनास्थळाचा नंबर सांगता येणार नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला स्वतंत्र अंगझडती पंचनामा दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, चांदवड पो.स्टेशनला दारु प्रतिबंधक कायद्याच्या असंख्य केसेस दाखल होत असतात. हे म्हणणे खरे आहे की,

आम्ही जेव्हा छापा टाकण्यासाठी जातो तेव्हा बऱ्याचदा बेवारस मुद्देमाल मिळून येतो. मात्र आरोपी मिळून येत नाही. कधी–कधी आरोपी मिळतो. मात्र मुद्देमाल मिळून येत नाही असे घडते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. जेव्हा मुद्देमाल मिळतो. मात्र आरोपी मिळून येत नाही तेव्हा त्याचा तपास कायमस्वरुपी चालू असतो किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.02.03 15:08:13 +0530

**दि. ०३.०२.२०२६** **(वृषाली दी. सुंगारे)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**